स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१०१ दि. १८/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्यक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नेमणूक करण्याबाबत...

संदर्भ : मा.उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांचे क्र.निवडणूक/कावि/सं.क्र.२/४०५/२०२६,नाशिक, दिनांक.१६/०६/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्य करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने जिल्हयामधील सर्व मतदार संघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती करणे, पात्र मतदारांची नोंदणी करणे, नाव–फोटोमध्ये दुरूस्ती करणे, स्थलांतरीत, मयत मतदारांची वगळणी करणे, ऑनलाईन नोंदणी बाबत मार्गदर्शन करणे तथापि सदर कार्यक्रम कालबध्दरित्या राबवावयाचा असल्याने कामाची पूर्तता विहित वेळेत करणेसाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्यक म्हणून रासेयो विद्यार्थ्यांची नेमणुक करण्यात येणार आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील रासेयो विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणून मा.उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांच्या dydeonashik@gmail.com या मेलवर पाठवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच त्यांना महाविद्यालयामार्फत योग्य ते सहकार्य करावे. आपल्या अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा.उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांचे यांचे पत्र

# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी नाशिक यांचे कार्यालय

दूरध्वनीक्र. 0253-2310523 ई.मेल-dydeonashik@gmail.com

निवडणुक तात्काळ

क्र.निवडणूक/कावि/सं.क्र.2/405 /2026
नाशिक, दिनांक - 16 / 06 / 2026.

प्रति,

मा. कुलगुरु,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रस्ता,
पुणे - ४११००७

**विषय — मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहाय्यक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना (NSS) प्रशिक्षणार्थ्यांची नेमणूक करणेबाबत.**

संदर्भ - 1) मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. 23/2025-ERS (Vol.II) Dt.14/05/2026
2) मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.ईएलआर-2026/प्र.क्र.76/ निवडणूक-6 दिनांक 25/05/2026
3) लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1950 चे कलम 29

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यांत येते की, संदर्भ क्र.1 नुसार मा.भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम 2026 ची घोषणा केलेली असून त्यानुसार दिनांक 30 जून 2026 पासून प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्यांत येणार आहे.

त्यानुषंगाने, मतदारांना विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम 2026 संदर्भात जनजागृती करणे, पात्र मतदारांची नोंदणी करणे, नांवात, फोटो मध्ये दुरुस्ती करणे, स्थलांतरीत, मयत मतदारांची वगळणी करणे, ऑनलाईन नोंदणी बाबत मार्गदर्शन करणे, तसेच मतदारांचे स्व-गणना पत्र भरणे, भारत निवडणूक आयोगाचे मोबाईल ॲप बाबत माहिती देणे, याबाबत मार्गदर्शन करून योग्य ते फॉर्म भरून घेण्याची कार्यवाही करण्यांत येणार आहे. या कामासाठी नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) हे प्रत्यक्ष घरोघरी जावून वरील नमूद केलेली कामे करीत आहेत. तथापि सदर कार्यक्रम कालबध्दरित्या राबवावयाचा असल्याने कामाची पूर्तता विहित वेळेत करणेसाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना 2 सहाय्यक नेमावेत अशा सूचना मा. मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई यांनी दिल्या आहेत.

आपणांस विनंती करण्यांत येते की, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना त्यांचे कामात सहाय्य करणेसाठी नाशिक जिल्हयातील NSS प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्त करावयाचे आहे. त्यानुषंगाने या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होणेसाठी नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालयातील NSS समन्वयकांना तसे निर्देश देऊन संबंधित सर्व NSS प्रशिक्षणार्थ्यांची तालुकानिहाय व महाविद्यालयनिहाय यादी (समन्वयकांचे नांव व मोबाईल क्रमांकासह) या कार्यालयाकडे तात्काळ पाठविणेबाबत सूचना द्याव्यात, ही विनंती.

( डॉ. मधुमती सरदेसाई )
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक